# -: महाराष्ट्र शासन :-
## गृह विभाग
## न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विद्यानगरी, कालीना, हंसभुग्रा मार्ग, सांताक्रुज (पूर्व), मुंबई - 400 098.
दूरध्वनी- 022- 2667 0755-58 फॅक्स - 022- 2667 0844
ई-मेल :- dfsl.mah@gmail.com Web :- www.maharashtra.gov.in


---

**जाहिरात क्रमांक 1, सन 2013-2014**

गट -क व गट-ड या संवर्गातील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी जाहिरात

---

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-2012/प्र.क्र.186/12, दि.28.2.2013 मधील तरतूदींनुसार तसेच शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एफएसएल-0413/प्र.क्र.287/पोल-4, दि.13.6.2013 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखालील मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक व अमरावती प्रयोगशाळेतील **गट क व गट ड संवर्गातील** सरळसेवेतील खालील रिक्त पदांसाठी **ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी खालील अटीं व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**2. उपलब्ध पदसंख्या :-**

| अ. क्र. | पदनाम ,गट व वेतन संरचना | एकूण पद संख्या | आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय पदे | आवश्यक शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वैज्ञानिक सहायक (गट क)<br>Scientific Assistant<br>रु.9300-34800 ग्रेड पे-4200 | 23 | 23 | विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र विषयासह मान्यताप्राप्त विद्यापीठाची कमीत कमी दुस-या वर्गात पदवी प्राप्त. | रासायनिक प्रयोगशाळा किंवा औद्योगिक प्रयोगशाळेतील अनुभव असल्यास प्राधान्य. |

| सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन 10% | खेळाडू 5% | इतर | एकूण |
| अनु.जाती | 1 | 1 | - | - | - | 2 | 4 |
| अनु.जमाती | - | 1 | - | - | - | - | 1 |
| भज-क | 1 | - | - | - | - | 1 | 2 |
| भज-ड | - | - | - | - | - | 1 | 1 |
| इमाव | 1 | 1 | | 1 | | 1 | 4 |
| खुला | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | 11 |
| एकूण | 6 | 4 | 1 | 2 | 1 | 9 | 23 |

2 पदे अनुशेषातीलआहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र),<br>(गट क)<br>Scientific Assistant (Psychology)<br>रु.9300-34800 ग्रेड पे-4200 | 2 | 2 | मानसशास्त्र विषयातील किमान व्दितीय श्रेणीतील पदवी उत्तीर्ण. | एक वर्ष मानसशास्त्रीय अभ्यासातील प्रशिक्षण आणि किंवा संशोधन व विकासाचा अनुभव धारण केला आहे, अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |

| सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन 10% | खेळाडू 5% | इतर | एकूण |
| अनु.जाती | - | - | - | - | - | 1 | 1 |
| खुला | - | - | - | - | - | 1 | 1 |
| एकूण | - | - | - | - | - | 2 | 2 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | वैज्ञानिक सहायक (सायबर गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण),<br>(गट क)<br>Scientific Assistant (Cyber Crime, Tape Authentication & Speaker Identification)<br>रु.9300-34800 ग्रेड पे-4200 | 5 | 5 | विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र किंवा संगणक शास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती आणि तंत्रज्ञान या विषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी अथवा अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र किंवा इलेक्ट्रॉनिक्स किंवा माहिती आणि तंत्रज्ञान या विषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी उत्तीर्ण. | एक वर्ष न्यायसहायक विज्ञानातील सायबर गुन्हे किंवा ध्वनी किंवा ध्वनीफीत विश्लेषणातील प्रशिक्षण आणि किंवा संशोधन आणि विकासाचा अनुभव धारण केला आहे, अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |

| सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन 10% | खेळाडू 5% | इतर | एकूण |
| अनु.जाती | - | - | - | - | - | 1 | 1 |
| अनु.जमाती | - | - | - | - | - | 1 | 1 |
| खुला | 1 | - | - | - | - | 2 | 3 |
| एकूण | 1 | - | - | - | - | 4 | 5 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक (गट क)<br>Senior Laboratory Assistant<br>रु.5200-20200 ग्रेड पे-2400 | 8 | 8 | विज्ञान शाखेत उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (HSC Science) परिक्षा उत्तीर्ण. | रासायनिक प्रयोगशाळा किंवा औद्योगिक प्रयोगशाळेतील अनुभव असल्यास प्राधान्य. |

| सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन 10% | खेळाडू 5% | इतर | एकूण |
| अनु.जाती | - | 1 | - | - | - | 1 | 2 |
| अनु.जमाती | - | - | - | - | - | 1 | 1 |
| भज-ब | - | 1 | - | - | - | - | 1 |
| इमाव | - | 1 | - | - | - | 1 | 2 |
| खुला | - | - | - | 1 | - | 1 | 2 |
| एकूण | - | 3 | - | 1 | - | 4 | 8 |
| 4 पदे अनुशेषातीलआहेत. | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | वरिष्ठ लिपिक (भांडार) (गट क)<br>Senior Clerk (Stores)<br>रु.5200-20200 ग्रेड पे-2400 | 1 | 1 | विज्ञान शाखेत उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (HSC Science) परीक्षा उत्तीर्ण. | भांडार विभागातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

| **सामाजिक आरक्षण** | **समांतर आरक्षण** | |
|---|---|---|
| | इतर | एकूण |
| विमाप्र | 1 | 1 |
| एकूण | 1 | 1 |
| 1 पद अनुशेषातीलआहे. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक (गट क)<br>Junior Laboratory Assistant<br>रु.5200-20200 ग्रेड पे-2000 | 7 | 7 | विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (SSC with Science) उत्तीर्ण. | --- |

| **सामाजिक आरक्षण** | **समांतर आरक्षण** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन 10% | खेळाडू 5% | इतर | एकूण |
| अनु.जमाती | - | - | - | - | - | 1 | 1 |
| इमाव | - | - | - | - | - | 1 | 1 |
| खुला | 2 | 1 | - | 1 | - | 1 | 5 |
| एकूण | 2 | 1 | - | 1 | - | 3 | 7 |
| 1 पद अनुशेषातीलआहे. | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7 | लिपिक टंकलेखक (गट क)<br>Clerk Typist<br>रु.5200-20200 ग्रेड पे-1900 | 11 | 11 | माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र (SSC) उत्तीर्ण. शासकीय वाणिज्य मंडळाची इंग्रजी 40 शब्द व मराठी 30 शब्द प्रति मिनिट टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण. | --- |

| **सामाजिक आरक्षण** | **समांतर आरक्षण** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन 10% | खेळाडू 5% | इतर | एकूण |
| अनु.जाती | - | 1 | - | - | - | 1 | 2 |
| विजा-अ | 1 | - | - | - | - | - | 1 |
| भज-ब | - | | - | - | - | 1 | 1 |
| भज-क | 1 | - | - | - | - | - | 1 |
| भज-ड | - | - | - | - | - | 1 | 1 |
| इमाव | - | - | - | - | - | 1 | 1 |
| खुला | 1 | 1 | - | 1 | - | 1 | 4 |
| एकूण | 3 | 2 | - | 1 | - | 5 | 11 |
| 4 पदे अनुशेष / 1 पद मूकबधीर | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | वाहनचालक (गट-क)<br>Driver<br>रु.5200-20200 ग्रेड पे-1900 | 2 | 2 | कमीत कमी 7 वी पास, वाहन कायदा 1939 अनुसार मोटार कार व जड वाहन चालविण्याचा परवाना. | कमीत कमी 2 वर्षाचा मोटार कार/जड वाहन चालविण्याचा अनुभव, सुदृढ शरीरयष्टी आणि संबंधित विभागातील रस्त्यांची सखोल माहिती असणे आवश्यक. |

| **सामाजिक आरक्षण** | **समांतर आरक्षण** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन 10% | खेळाडू 5% | इतर | एकूण |
| अनु.जाती | - | - | - | - | - | 1 | 1 |
| इमाव | - | - | - | - | - | 1 | 1 |
| एकूण | - | - | - | - | - | 2 | 2 |
| 2 पदे अनुशेषातीलआहेत. | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9 | प्रयोगशाळा परिचर (गट-ड)<br>Laboratory Attendant<br>रु.5200-20200 ग्रेड पे-1900 | 16 | 16 | माध्यमिक शालांत परीक्षा अनुत्तीर्ण (10 वी नापास) | शासकीय प्रयोगशाळेततील अनुभव असल्यास प्राधान्य. |

| **सामाजिक आरक्षण** | **समांतर आरक्षण** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन 10% | खेळाडू 5% | इतर | एकूण |
| अनु.जाती | 1 | - | - | - | - | 1 | 2 |
| अनु.जमाती | - | 1 | - | - | - | - | 1 |
| विजा-अ | 1 | - | - | | - | 1 | 2 |
| भज-क | - | - | - | - | - | 1 | 1 |
| इमाव | 1 | - | - | - | - | 2 | 3 |
| खुला | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 7 |
| एकूण | 5 | 2 | 1 | 1 | 1 | 6 | 16 |
| 3 पदे अनुशेषातील आहेत. | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 10 | चपराशी (गट-ड)<br>Peon<br>रु.4440-7440 ग्रेड पे-1300 | 3 | 3 | शासकीय मान्यताप्राप्त शाळेतून 4 थी उत्तीर्ण. | --- |

| **सामाजिक आरक्षण** | **समांतर आरक्षण** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला 30% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन 10% | खेळाडू 5% | इतर | एकूण |
| अनु.जमाती | - | 1 | - | - | - | - | 1 |
| इमाव | 1 | - | - | - | - | 1 | 2 |
| एकूण | 1 | 1 | - | - | - | 1 | 3 |
| 3 पदे अनुशेषातीलआहेत. | | | | | | | |

| 11 | सह आचारी (गट-ड)<br>Assistant Cook<br>रु.4440-7440 ग्रेड पे-1300 | 1 | 1 | लिहिता व वाचता येणे आवश्यक. | किमान 1 वर्षाचा उपहारगृहातील खादयपदार्थ बनविण्याचा अनुभव आवश्यक |
|---|---|---|---|---|---|

| सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षण | |
|---|---|---|
| | इतर | एकूण |
| खुला | 1 | 1 |
| एकूण | 1 | 1 |

टिप :- वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एचडीओ-2011/प्र.क्र.4/आस्था-1, दिनांक 9.3.2011 अन्वये अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, 1995 नुसार या संचालनालयाच्या आस्थापनेवरील पदे नि:समर्थ असलेल्या व्यक्तींसाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत.

**1.** खाली नमूद पदांची लेखी परिक्षा नमूद सत्रात घेण्यात येणार असल्याने एका सत्रातील फक्त एकाच पदासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. **वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक व वरिष्ठ लिपिक (भांडार) या पदांसाठी एकच लेखी परिक्षा घेण्यात येणार असल्याने उमेदवार सदर दोन्ही पदांसाठी अर्ज करू शकतो.**

| **दिनांक 1.3.2014 (सत्र-अ)<br>दुपारी 3 ते 6 दरम्यान** | **दिनांक 2.3.2014 (सत्र-ब)<br>पहिले सत्र (सकाळी 11 ते 1 दरम्यान)** |
|---|---|
| वैज्ञानिक सहायक, गट-क | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक, गट-क |
| वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र), गट-क | वाहनचालक, गट-क |
| वैज्ञानिक सहायक (सायबर गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण), गट-क | चपराशी, गट-ड |
| प्रयोगशाळा परिचर, गट-ड | **दुसरे सत्र (दुपारी 2 ते 5 दरम्यान) (सत्र-क)** |
| | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक/<br>वरिष्ठ लिपिक (भांडार), गट-क |
| | लिपिक टंकलेखक, गट-क |
| | सह आचारी, गट-ड |

**1.1.** उमेदवारास एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास एकाच अर्जात सर्व पर्याय उपलब्ध असल्याने (Multi option choice for various posts) एकच अर्ज करावा. **परंतु, प्रत्येक पदासाठी वेगवेगळी फी भरणे आवश्यक राहील.**

**2. परीक्षा शुल्क :-**

**अनु.क्र.1 ते 11** वरील प्रत्येक पदांकरीता अमागास उमेदवारांसाठी रू.350/- + बँकेचे शुल्क
मागास उमेदवारांसाठी रू.250/- + बँकेचे शुल्क

**माजी सैनिकांना परिक्षा शुल्क अट लागू नाही.**

विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र व इमाव प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) मध्ये मोडणा-या म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रू.6.00 लाखापेक्षा अधिक आहे अशा उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे आवश्यक संपूर्ण परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे व त्यांना खुला गटातील समजण्यात येईल. तसेच ते वयोमर्यादेतील सवलतीसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाहीत.

**3. <u>वयोमर्यादा</u> :-**

**3.1.** सर्व पदासाठी उमेदवारांचे वय दिनांक 1.1.2014 रोजी किमान वय 18 वर्षे पूर्ण तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल 33 वर्षे व महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल 38 वर्षे राहील.

**3.2.** शासकीय कर्मचा-यांना कमाल वयोमर्यादेची अट नाही.

**3.3.** सशस्त्र दलात किमान 6 महिने सेवा केलेल्या माजी सैनिकांमधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल अधिक 3 वर्षे एवढा काल त्यांच्या विहीत दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ, दिनांक 20.8.2010 नुसार माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-3 व वर्ग-4 मधील पदांसाठी नेमणूकीकरीता कमाल वयोमर्यादा 45 वर्षेपर्यंत राहील. बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारीरिक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळेसेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक/आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.

**3.4.** नि:समर्थ असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील.

**3.5.** स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, 1991 जनगणना कर्मचारी व 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी यांना कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील.

**3.6.** पदवीधर/पदविकाधारक अंशकालिन उमेदवारांच्या बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये 3 वर्षापर्यत दरमहा मानधनावर काम केलेले असले पाहिजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारास मुलाखतीच्या वेळी व नियुक्तीच्या वेळी सादर करावी लागतील. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अंक-1009/प्र.क्र.200/2009/16-अ, दिनांक 27.10.2009 नुसार अंशकालीन कर्मचा-यास कमाल वयोमर्यादा 46 वर्षे इतकी शिथिलक्षम राहील.

**3.7.** नि:समर्थ असलेल्या व्यक्तीने (किमान 40 टक्के) अपंगत्वाबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**अ**) उमेदवाराने स्वत: लेखनिकाची व्यवस्था करावयाची असून लेखनिकाच्या मानधनाची व्यवस्था उमेदवाराकडून करण्यात येईल. ऐनवेळी लेखनिकाची परवानगी देता येणार नाही, याची कृपया दक्षता घ्यावी.

**ब**) लेखी परीक्षेच्या वेळी लेखनिकाची मदत आवश्यक असल्यास खालील माहितीसह अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या अवधीत अध्यक्ष, निवडसमिती तथा संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, विद्यानगरी, कलीना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई-400 098 यांच्या नांवे अर्जाच्या छायांकित प्रतींसह साध्या कागदावर स्वतंत्र अर्ज करून दि.12.2.2014 रोजी कार्यालयीन वेळेपर्यंतच पूर्वपरवानगी लेखी स्वरुपात घेणे बंधनकारक राहील. तदनंतर याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येणार नाही.

1) पदाचे नांव :-

2) नोंदणी क्रमांक :-

3) उमेदवाराचे नाव :-

4) लेखनिकाचे नाव :-

5) लेखनिकाचा संपूर्ण पत्ता :-

6) उमेदवाराची शैक्षणिक अर्हता :-

7) लेखनिकाची शैक्षणिक अर्हता :-

8) उमेदवार व लेखनिक एकाच विद्या शाखेचे आहेत काय :-

9) उमेदवार व लेखनिक एकाच विद्या शाखेचे असल्यास लेखनिक उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी / टप्पा कमी आहे काय :-

**क)** ऐनवेळी सदर लेखनिक अनुपस्थित राहिल्यास त्याची जबाबदारी पूर्णत: उमेदवाराची राहील.

**ड)** प्रवेश प्रमाणपत्रावरील उमेदवारांना दिलेल्या सर्व सूचनांचे व परीक्षेच्या वेळी दिलेल्या सर्व सूचनांचे लेखनिकाने पालन करणे आवश्यक राहील.

**इ)** लेखनिकाने व उमेदवाराने सूचनांचे पालन न केल्यास त्यांच्याविरूध्द प्रचलित नियमांनुसार कडक कार्यवाही करण्यात येईल.

**3.8.** प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांनी संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेल्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मूळ प्रत मुलाखतीसाठी येताना सादर करणे आवश्यक राहील.

**3.9.** खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन वयोमर्यादेत 5 वर्षापर्यंत वयाची अट शिथिलक्षम राहील.

**4. <u>शैक्षणिक अर्हता</u> :-**

**अ)** जाहिरातीतील सर्व पदासाठी नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दि.1.1.2014 रोजी धारण करणे आवश्यक आहे.

**ब) <u>टंकलेखन अर्हता</u> :-**

मराठी टंकलेखन 30 श.प्र.मि. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र व इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक राहील. सदर अर्हता दि.1.1.2014 रोजी धारण करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक निवक-1010/प्र.क्र.08/2010/16-अ, दि.6.10.2010 अन्वये प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन 1991 चे जनगणना कर्मचारी, 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना जर त्यांना लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून 6 महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक 3.9.1993 मधील उपपरिच्छेद क्रमांक 3(बी) परंतुकान्वये माजी सैनिक प्रवर्गातून लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून 11 महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येत आहे.

**क) <u>संगणक अर्हता</u> :-**

जाहिरातीमधील गट क पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांची निवड झाल्यास त्यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39, मंत्रालय, मुंबई दिनांक 19.3.2003 नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत संगणक हाताळणी/वापराबाबतचे खाली नमुद केलेले प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पूर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.

**(अ)** D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**किंवा**

**(ब)** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**ड) <u>मराठी/ हिंदी भाषा परिक्षा</u> :-**

माध्यमिक शालांत परिक्षेत मराठी/हिंदी विषय घेतले नसल्यास, नियुक्तीनंतर संबंधित नियमानुसार एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**इ) <u>फक्त वाहन चालक पदाकरिता</u> :-**

वाहन कायदा 1939 अनुसार मोटार कार व जड वाहन चालविण्याचा दि.1.1.2012 पूर्वीचा प्राधिकृत परवाना.

**5. <u>अर्ज करण्याची पध्दत</u> :-**

**5.1.** प्रस्तुत परिक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

**5.2.** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज www.formonline.net/fsl व www.maharashtra.gov.in या वेबसाईटव्दारे **दिनांक 31.1.2014 रोजी 23.59 वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज सादर करण्याची लिंक बंद केली जाईल.** चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत परीक्षा शुल्क अर्ज सादर केल्यानंतर लगतच्या एक दिवसानंतर (सुटटीचे दिवस वगळून) ते **दि.4.2.2014 पर्यंत भरणे बंधनकारक राहील. अन्यथा परीक्षा शुल्क भरले नाही असे समजून अर्ज नाकारला जाईल.**

**5.3** ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना www.formonline.net/fsl व www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बॅक ऑफ इंडिया या बॅकेत फी भरण्याचे चलन 02 प्रतींमध्ये उपलब्ध होईल. (उमेदवाराची प्रत व बॅंकेची प्रत) सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच अर्ज सादर केल्यानंतर लगतच्या एक दिवसानंतर (सुटटीचे दिवस वगळून) उमेदवाराने आवश्यक ते परीक्षा शुल्क स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहील. सदरच्या दोन प्रतींपैकी उमेदवारास त्याची प्रत स्टेट बॅंक ऑफ इंडिया कडून परत मिळेल. त्यापैकी उमेदवाराची प्रत अशा उमेदवाराने कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करावी.

**5.4.** बॅंकेमध्ये विहीत परीक्षा शुल्काच्या चलनाव्दारे भरणा केल्यानंतर लगतच्या एक दिवसानंतर (सुटटीचे दिवस वगळून) उमेदवाराने फोटो व स्वाक्षरी दिनांक 6.2.2014 रोजी 23.59 पर्यंतच ऑनलाईन फॉर्मवर अपलोड करणे आवश्यक राहील. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. विहित केलेल्या कालावधीत पूर्ण न भरलेले ऑनलाईन अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

**5.5.** ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो व स्वत:चा ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:चा फोटो (35 kb) व स्वाक्षरी (30 kb) यापेक्षा जास्त नसलेली इमेज स्कॅन करुन **jpg** फॉर्मेट मध्ये Save करून अपलोड करावी.

**5.6.** उमेदवाराने स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी आणि फोटो, प्रवेशपत्र, हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या अथवा मुलाखतीच्या वेळी अन्य कोणत्याही कारणाच्या वेळी अर्ज भरतांना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**5.7.** उमेदवारास प्रवेशपत्र ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर परीक्षेपूर्वी 10 दिवस ते परिक्षेच्या दिनांकापावेतो स्वत:च्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रवेशपत्र उमेदवाराने डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही. तसेच प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही.

**6. <u>परीक्षेचे टप्पे</u> :-**

**अनु.क्रमांक 1 ते 7 व 9 ते 11** वरील पदांची भरती लेखी परीक्षा व मौखिक चाचणी या दोन टप्प्यामध्ये घेण्यात येणार असून लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर पात्र उमेदवारांची मौखिक चाचणी घेण्यात येईल.

**अनु.क्रमांक 8** वरील पदांची भरती लेखी परीक्षा, व्यावसायिक चाचणी व मौखिक चाचणी या तीन टप्प्यामध्ये घेण्यात येणार असून लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर पात्र उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. तसेच व्यावसायिक चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची मौखिक चाचणी घेण्यात येईल.

**7. <u>परीक्षेचे ठिकाण</u> :-** मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक व अमरावती या ठिकाणी लेखी परिक्षा घेण्यात येतील. व्यावयायिक चाचणी आणि मुलाखती फक्त न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई येथे घेण्यात येतील.

**8. <u>परीक्षेचा अभ्यासक्रम</u> :- 1)** मराठी :- व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर **2)** इंग्रजी :- स्पेलिंग, व्याकरण, सोपी वाक्यरचना आणि नेहमीच्या शब्दांचा वापर **3)** सामान्य ज्ञान :- दैनंदिन घटना,नेहमीचे अनुभव, साहित्य, राजकारण,शास्त्र हे अजमावण्यासाठी प्रश्न सामाजिक औद्योगिक सुधारणा, क्रिडा या क्षेत्रातील महान व्यक्तिंची कार्य सर्वसाधारणपणे भारताच्या विशेष करुन महाराष्ट्राच्या इतिहास व भूगोलाची रुपरेषा यावरील प्रश्न **4)** अंकगणित, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, दशांश अपूर्णांक, सरासरी व टक्केवारी **5)** बुध्दीमापन विषयक प्रश्न उमेदवार किती जलद व अचूकपणे विचार करु शकतो हे अजमावण्यासाठी प्रश्न विचारण्यात येतील. **6)** विज्ञान/मानसशास्त्र/विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र/संगणक शास्त्र/इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान तसेच अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र/ इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान:- संबंधित पदाकरीता आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्रश्नांची रूपरेषा असेल. तसेच सर्व पदांची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न या स्वरुपाची राहील.

**9. <u>परीक्षेचे स्वरुप</u> :-**

| अ. क्र. | संवर्ग | परीक्षेसाठी गुण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | व्यावसायिक चाचणी | मौखिक परीक्षा | एकूण गुण |
| 1 | वैज्ञानिक सहायक | 200 | - | 25 | 225 |
| 2 | वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र) | 200 | - | 25 | 225 |
| 3 | वैज्ञानिक सहायक (सायबर गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण) | 200 | - | 25 | 225 |
| 4 | वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक | 200 | - | 25 | 225 |
| 5 | वरिष्ठ लिपिक (भांडार) | 200 | - | 25 | 225 |
| 6 | कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक | 200 | - | 25 | 225 |
| 7 | लिपिक टंकलेखक | 200 | - | 25 | 225 |
| 8 | वाहनचालक | 50 | 40 | 10 | 100 |
| 9 | प्रयोगशाळा परिचर | 75 | - | 25 | 100 |
| 10 | चपराशी | 75 | - | 25 | 100 |
| 11 | सह आचारी | 75 | - | 25 | 100 |

**9.1. वैज्ञानिक सहायक (अनु.क्र.1)** या पदाची किमान अर्हता विज्ञान शाखेतील रसायनशास्त्र विषयासह मान्यताप्राप्त विद्यापीठाची कमीत कमी दुस-या वर्गात पदवी उत्तीर्ण (B.Sc.(Chemistry) IInd Class) आहे. या पदाकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परिक्षेच्या दर्जासमान असेल. परंतु मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांन्त परिक्षेच्या (इयत्ता 12 वी) च्या दर्जाच्या समान राहील. लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दिक चाचणी व विज्ञान या विषयांकरिता प्रत्येकी 40 गुण असून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.2. वैज्ञानिक सहायक (मानसशास्त्र) (अनु.क्र.2)** या पदाची किमान अर्हता मानसशास्त्र विषयातील किमान व्दितीय श्रेणीतील पदवी उत्तीर्ण (B.A.(Psychology) IInd Class) आहे. या पदाकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम भारतातील मान्यताप्राप्त विदयापीठांच्या पदवी परिक्षेच्या दर्जासमान असेल. परंतु मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांन्त परिक्षेच्या (इयत्ता 12 वी उत्तीर्ण) दर्जा समान राहील. लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दिक चाचणी व मानसशास्त्र विषयांकरिता प्रत्येकी 40 गुण असून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.3. वैज्ञानिक सहायक (सायबर गुन्हे, ध्वनी व ध्वनीफीत विश्लेषण) (अनु.क्र.3)** या पदाची किमान अर्हता विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र/संगणक शास्त्र/इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान या विषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी अथवा अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र/ इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान या विषयासह किमान व्दितीय श्रेणीतील पदवी उत्तीर्ण (B.Sc.(Physics/Computer Science/ Electronics/Information Technology) or B.E.(Computer Science/Electronics/Information Technology) IInd Class) आहे. या पदाकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम भारतातील मान्यताप्राप्त विदयापीठांच्या परिक्षेच्या दर्जासमान असेल. परंतु मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांन्त परिक्षेच्या (इयत्ता 12 वी उत्तीर्ण) दर्जा समान राहील. लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दिक चाचणी तसेच विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र/संगणक शास्त्र/इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान तसेच अभियांत्रिकी शाखेतील संगणक शास्त्र/ इलेक्ट्रॉनिक्स/माहिती तंत्रज्ञान या विषयांकरिता प्रत्येकी 40 गुण असून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.4. वरिष्ठ प्रयोगशाळा सहायक (अनु.क्र.4) व वरिष्ठ लिपिक (भांडार) (अनु.क्र.5)** या पदांची किमान अर्हता विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (इयत्ता 12 वी विज्ञान) आहे. या पदांकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दिक चाचणी व विज्ञान या विषयांकरिता प्रत्येकी 40 गुण असून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.5. कनिष्ठ प्रयोगशाळा सहायक (अनु.क्र.6)** या पदाची किमान अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा विज्ञान विषयासह उत्तीर्ण (इयत्ता 10 वी विज्ञान विषयासह) आहे. अशा पदाकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालान्त परीक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, अंकगणित व विज्ञान या विषयांकरिता प्रत्येकी 40 गुण असून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.6. लिपिक टंकलेखक (अनु.क्र.7)** या पदांकरीता अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण (इयत्ता 10 वी) विहित केली आहे. त्या पदांकरीता लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व अंकगणित या विषयांकरिता प्रत्येकी 50 गुण असून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.7. वाहनचालक (अनु.क्र.8)** या पदांकरीता शैक्षणिक अर्हता 7 वी उत्तीर्ण अशी विहित केली आहे. अशा पदाकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतील इयत्ता 7 वी परीक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, अंकगणित व वाहतूक नियम या विषयांकरिता प्रत्येकी 10 गुण असून एकूण 50 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.8. प्रयोगशाळा परिचर (अनु.क्र.9)** या पदाची किमान अर्हता माध्यमिक शालान्त परीक्षा अनुत्तीर्ण (इयत्ता 10 वी नापास) आहे. अशा पदाकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतील इयत्ता 9 वी च्या परीक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेला मराठी, सामान्यज्ञान, अंकगणित या विषयांकरिता प्रत्येकी 25 गुण असून एकूण 75 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.9. चपराशी (अनु.क्र.10)** या पदांकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेतील इयत्ता 4 थी च्या परीक्षेच्या दर्जासमान असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी, सामान्यज्ञान, अंकगणित या विषयांकरिता प्रत्येकी 25 गुण असून एकूण 75 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.10. सह आचारी (अनु.क्र.11)** या पदांकरीता परीक्षेचा अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या कनिष्ठ स्तरावरील असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी, सामान्यज्ञान, अंकगणित या विषयांकरिता प्रत्येकी 25 गुण असून एकूण 75 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**9.11.** ज्या पदांसाठी लेखी व मौखिक परीक्षा ठेवली आहे, अशा पदांसाठी उमेदवारांच्या लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीकरिता पात्रता ठरवून अशा उमेदवारांची मौखिक परीक्षा घेण्यात येईल. लेखी व मौखिक परीक्षेचे गुण एकत्रित करुन अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. मौखिक परीक्षेसाठी गैरहजर राहिल्यास उमेदवारांची निवड करण्यात येणार नाही.

**9.12.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-2010/209/प्र.क्र.66/10/13-अ, दिनांक 19.6.2010 नुसार लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

**9.13.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-2007/प्र.क्र.46/7/13-अ, दिनांक 27.6.2008 आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-1011/प्र.क्र.99/11/13-अ, दिनांक 26.12.2011 नुसार अंतिम गुणवत्ता यादीचे निकष लावण्यात येतील.

## 10. सर्वसाधारण अटीं व शर्ती :-

**10.1.** उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्र, अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. परंतु ऑनलाइन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरतांना केलेला जातीचा, महिला, माजी सैनिक, खेळाडू तसेच अपंगत्वाचा दावा इत्यादी बाबींमध्ये तद्नंतर कोणत्याही कारणास्तव बदल करता येणार नाही. त्यामध्ये काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाइन अर्ज भरताना खोटी माहिती भरल्याचे निर्दशनास आल्यास संबंधित उमेदवारास फसवणुकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच सदर उमेदवाराचा नियुक्तीबाबतचा अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**10.2.** उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. उमेदवाराने मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल. छाननीअंती प्रमाणपत्रांमध्ये त्रुटीं आढळल्यास अथवा माहिती खोटी आढळल्यास मुलाखतीस पात्र समजण्यात येणार नाही तसेच नियुक्ती दिली जाणार नाही.

**10.3. अ)** शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्र.क्र.66/2011/ई-10, दिनांक 27.6.2011 नुसार ज्या उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

**ब**) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

**क)** उपरोक्त बाबीं फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारासाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील. अर्जदारास मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान व लिहिता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे.

**10.4.**उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्र, वेळ व दिनांक तसेच परीक्षेचे प्रवेशपत्र www.formonline.net/fsl व www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर साधारण परीक्षेच्या 10 दिवस आधी उपलब्ध होईल. तसेच प्रवेशपत्र या संकेतस्थळावरून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहिल.

**10.5.** उमेदवारास लेखी परिक्षा, व्यावसायिक चाचणी व मौखिक चाचणीसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

**10.6.** रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नावनोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी रितसर ऑनलाइन अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. तसेच मुलाखतीच्या वेळेला मूळ नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**10.7.** शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज नियुक्ती प्राधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने भरावी व परवानगीची मूळ प्रत प्रमाणपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहिल.

**10.8.** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दि.12.12.2011 नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र संबंधित समितीकडून पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**10.9.** महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29.1.2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर तत्व) विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**10.10.** विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, इ.मा.व. आणि वि.मा.प्र. तसेच खुला (महिला) या प्रवर्गातील उमेदवारांनी दिनांक 1.4.2012 नंतरचे सक्षम अधिका-याचे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी (मुलाखतीच्यावेळी) सादर करणे आवश्यक राहिल. तसेच सदर आरक्षणाचा लाभ समाजातील उन्नत व प्रगत गटातील उमेदवारांना अनुज्ञेय असणार नाही.

**10.11.** अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील उमेदवारांनी शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र.एसटीसी-1696/प्र.क्र.34/का-10,दिनांक 07.03.1996 आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी आदेश काढून विहीत केलेल्या नमुन्यात जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**10.12.** महिलांसाठी आरक्षण हे समांतर आरक्षण राहील. महिला आरक्षण हे महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/प्र.क्र.415/का-2, दिनांक 25.5.2001 मधील तरतुदीनुसार आणि तद्नंतर शासनाने हया संदर्भात निर्गमित केलेल्या आदेशातील तरतुदीनुसार राहील. तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम अधिकारी यांचे नॉन क्रिमीलेअर दिनांक 1.4.2012 नंतरचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**10.13.** खेळाडू वर्गवारीसाठी दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची खेळाडू बाबतची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक संचालनालयाकडून प्रमाणित करून ठेवावीत.

**10.14.** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे परिपत्रक क्रमांक अपंग-2009/प्र.क्र.133/सुधार-3, दि.14.1.2011 नुसार नि:समर्थ असलेल्या व्यक्तींकरीता असलेल्या आरक्षणाचा फायदा घेऊन सदर प्रवर्गात निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्तीपूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्यांची अंतिम नियुक्ती करण्यात येईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे.

**10.15.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मासैक-1012/प्र.क्र.198/16-अ, दिनांक 30.4.2013 नुसार Government of India, Ministry of Personnel P.G.& Pensions (Department of Personnel & Training) No.36034/5/85-Estt (SCT), New Delhi Dt.27.10.1986 च्या राजपत्रात सैनिक दलात कार्यरत असताना 1 वर्षा अगोदर माजी सैनिक या पदासाठी अर्ज करता येईल. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र ठरल्यास नियुक्तीचे अधिकार अध्यक्ष, निवड समिती तथा संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील.

**10.16.** उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

**10.17.** सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28.3.2005 व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 1.7.2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापन) नियम 2005 अन्वये दि.28.3.2005 रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या बाबत लहान कुटुंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र मुलाखतीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**10.18.** नि:समर्थ असलेल्या व्यक्ती/माजी सैनिक/खेळाडू/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या घटकातील अर्जदाराने त्यांच्या अर्जासोबत त्या पृष्ठयर्थ सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र/दाखला सादर करणे आवश्यक राहील.

**10.19.** नियुक्त होणा-या उमेदवारास शासन निर्णय क्र.अनियो-1005/126/सेवा-4, दिनांक 31.10.2005 नुसार नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना (Contributory Fund) लागू राहील. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी तसेच निवृत्ती वेतन लागू राहणार नाही.

**10.20. परिक्षेचा प्रकार, पदांच्या संख्येतील बदल, समांतर आरक्षण, सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे तसेच सदरहू रिक्त पदे शासनाच्या धोरणानुसार भरण्यात येत असून सदरहू जाहिरातीतील पदे भरण्यास तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास कार्यवाही स्थगित करणे/रदद् करणे/ परिक्षा स्थगित करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, निवडसमिती स्वत:कडे राखून ठेवत आहेत. याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. भरती प्रक्रियेसंदर्भात उद्भवणारे वाद, तक्रारीबाबत निवडसमितीचा निर्णय अंतिम राहिल.** तसेच उमेदवाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

**10.21.** एखादा उमेदवार लेखी परिक्षेत अधिक गुण मिळवून देखील मौखिक परिक्षेसाठी गैरहजर राहील्यास, त्यांच्या नियुक्तीबाबत शिफारस करता येणार नाही. उमेदवारांची अंतिम निवड लेखी व मौखिक परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे केली जाईल.

**10.22.** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16-अ, दि.16.3.1999 अन्वये समांतर आरक्षणांतर्गत त्या-त्या प्रवर्गासाठी विहित केलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळणेसाठी त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांतून जागा भरण्यात येतील.

**10.23.** शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पअंक-1010/717/प्र.क्र.322/10/16-अ, दि.26.8.2010 नुसार एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही. त्यानुसार आरक्षणाचा लाभ घेतलेला नाही किंवा घेणार नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**10.24.** निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच असा उमेदवार कायदेशीर कार्यवाहीस पात्र ठरेल.

**10.25.**अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना संचालनालयाच्या अधिपत्त्याखालील मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक व अमरावती यापैकी कोणत्याही प्रयोगशाळेत नियुक्ती देण्यात येईल.

**10.26.** शासन सेवेत नियुक्ती झालेल्या उमेदवारांना रूजू झाल्यानंतर त्यांची सेवा महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात असलेल्या व नव्याने स्थापन होणा-या प्रयोगशाळेत बदलीपात्र असेल.

**11. <u>उमेदवारांना सूचना</u> :-**

**11.1.** उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वत:किंवा इतरामार्फत निवड समितीच्या सदस्यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. याबाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

**11.2.** प्रवेशपत्र असल्याशिवाय लेखी परिक्षेस/व्यावसायिक चाचणी परिक्षेस/प्रत्यक्ष मुलाखतीस बसण्यास परवानगी मिळणार नाही.

**11.3.** या परिक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही. तरी ज्या उमेदवारांकडे आवश्यक पात्रता नसेल त्यांनी अर्ज करु नयेत.

**11.4.** मुलाखतीच्या वेळी किंवा निवडसमितीस आवश्यकता असेल त्यावेळी वर नमूद केलेली आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

**11.5.** उमेदवार निवडीबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम असेल, त्यासंबधी कोणत्याही पत्रव्यवहारासंबधी उत्तर देणे संचालनालयास बंधनकारक राहणार नाही.

**11.6.** या संदर्भातील वेळोवेळी देण्यात येणा-या सूचना व माहिती मिळविण्यासाठी वरील संकेतस्थळाचा उपयोग करावा.

**11.7.** यासंदर्भात काही मदत आवश्यक असल्यास तसेच परीक्षेपूर्वी 3 दिवसांपर्यंत प्रवेशप्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या आवश्यक पुराव्यासह संचालनालयाच्या कार्यालयात व्यक्तीश: संपर्क साधावा. यासंदर्भात उमेदवाराला कार्यालयीन वेळेत **<u>9769199421</u>** या दूरध्वनी क्रमांकावरून आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**12.** उमेदवारांना समान गुण मिळाल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-2007/प्र.क्र.46/ 7/13-अ, दिनांक 27.6.2008 मधील परिच्छेद क्रमांक 6 मध्ये नमूद निकषांवर क्रमवार लावला जाईल.

**13. निवडसूची व तिची कालमर्यादा :-**

निवड समितीने तयार केलेली निवडसूची 1 वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल. त्यानंतर निवडसूची व्यपगत होईल.

**पदभरती प्रक्रियेबाबतचा सर्वसाधारण कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील**

| | | |
|---|---|---|
| 1 | अर्ज भरण्याचा दिनांक | दि.11.1.2014 ते दि.31.1.2014 रोजी 23.59 वाजेपर्यंत |
| 2 | परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि.4.2.2014 रोजी बँकेच्या कामकाजाच्या वेळेपर्यंत |
| 3 | फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्याचा अंतिम दिनांक | दि.6.2.2014 रोजी 23.59 वाजेपर्यंत |
| 4 | लेखी परिक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध | परीक्षेपूर्वी 10 दिवस |
| 5 | लेखी परिक्षेचा दिनांक | दि.1.3.2014 व दि.2.3.2014 |
| 6 | मौखिक चाचणी परिक्षेचा दिनांक | दि.1.4.2014 पासून (संभाव्य) |

वरील कार्यक्रमात बदल झाल्यास तो वृत्तपत्रात तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. या संदर्भातील अंतिम निर्णय अध्यक्ष, निवडसमिती तथा संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

**स्वाक्षरीत/-**
सदस्य सचिव, निवड समिती तथा
सह संचालक, न्या.वै.प्र.शाळा संचालनालय, महाराष्ट्र राज्य

स्थळ :- मुंबई
दिनांक :- 9.1.2014

(1) संचालनालयाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच व्यावसायिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (2) मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.